# बृहन्मुंबई महानगरपालिका

प्रति - महापालिका चिटणीस

प्रेषक - महापालिका आयुक्त

**विषय - महापालिका रुग्णालयांमध्ये विविध उपचारांसाठी आकारण्यात येणाऱ्या विद्यमान शुल्क व आकार सूचीमध्ये सुधारणा करणे.**

संदर्भ :-१) महानगरपालिका ठराव क्र. १२८५ दि. २९.०२.१९८८.

२) स्थायी समिती ठराव क्र. १६३९ दि . ०८. ०३. १९९१.
म न पा ठराव क्र. १९ दि १४. ०९ . १९९१

३) स्थायी समिती ठराव क्र. ८८९ दि. १२. १०. १९९१
म न पा ठराव क्र.८९३ दि २७. ११ . १९९१

४) स्थायी समिती ठराव क्र. ८५१ दि. १४.१०.१९९१
म न पा ठराव क्र. ८०२, दि २५.११.१९९१

५) स्थायी समिती ठराव क्र. १०८ दि. ०४.०४.१९९३
म न पा ठराव क्र. १५७ दि २१.०६.१९९३

६) स्थायी समिती ठराव क्र. ९९४ दि. ०८.११.१९९३
म न पा ठराव क्र. ९६९ दि २६.१२.१९९३

७) स्थायी समिती ठराव क्र. १५६७ दि. २४.०२.१९९५
म न पा ठराव क्र. २७ दि ०५.०४.१९९५

८) स्थायी समिती ठराव क्र. ५८१ दि. २२.०८.१९९५
म न पा ठराव क्र. १५५६ दि ११.०३.१९९६

९) स्थायी समिती ठराव क्र. ५८३ दि. २२.०८.१९९५
ग न पा ठराव क्र. १४४६ दि ११.०३.१९९६

१०) स्थायी समिती ठराव क्र. ७९० दि. ११.१०.१९९४
म न पा ठराव क्र. ११११ दि ११.१२.१९९५

११) स्थायी समिती ठराव क्र. ७९ दि. २६.०४.१९९६
म न पा ठराव क्र. २५६ दि ०८.०७.१९९६

१२) स्थायी समिती ठराव क्र. २९९ दि. २६.०६.१९९६
म न पा ठराव क्र. ३५८ दि ०९.०८.१९९६

१३) स्थायी समिती ठराव क्र. ६११ दि.०२.०३.२०००
म न पा ठराव क्र. ६७ दि २८.०४.२०००

Scanned by CamScanner

रुग्णालये आणि दवाखाने यांची आस्थापना व व्यवस्थापन करणे हे जरी महानगरपालिकेचे वैधानिक कर्तव्य असेल तरी भारतीय वैद्यकीय परिषदेणे ठरवून दिलेल्या मापदंडानुसर वैद्यकीय महाविद्यालये चालविणे त्यांचे व्यवस्थापन करणे हा महानगरपालिकेवर अतिरिक्त बोजा आहे. रूग्णालयामध्ये विविध आजारांवर उपचार करण्यासाठी महागडी व अत्याधुनिक यंत्रसामुग्रीची खरेदी व त्यांच्या परिरक्षणाकरिता निर्माण होणारा खर्च तसेच आस्थापनेवर होणारा वाढता खर्च भागविण्यासाठी रुग्णालयांचा महसूल काही प्रमाणात वाढविणे गरजेचे आहे. रुग्णालये ही धर्मादाय तत्वावर चालविली जात असल्याने रूग्णालयांमध्ये जमा होणारा महसूल रुग्णालयांवर होणाऱ्या प्रचंड खर्चाच्या तुलनेत अगदीच नगण्य आहे. ही बाब विचारत घेऊन रूग्णालयांमध्ये विविध चाचण्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये वाढ करण्यासाठी स्थायी समितीने दि.०२.०३.२००० च्या ठराव क्र. ६११ तसेच महानगरपालिकेने दि. २८.०४.२००० च्या ठराव क्र. ६७ अन्वये मान्यता दिली आहे. सदर निर्देश परिपत्रक क्र. टीआरव्ही /२०४ दि. ०९.०५.२००० अन्वये प्रस्तुत करण्यात आलेले असून सदर मंजूर झालेल्या दरांप्रमाणे सध्या शुल्क वसूली केली जात आहे.

सदर शुल्क सुचीमध्ये गेल्या १५ वर्षात कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. गेल्या १५ वर्षामध्ये यंत्रसामग्रीची खरेदी, तिचे परिरक्षण तसेच आस्थापना खर्च यामध्ये झालेली मोठ्या प्रमाणावरील वाढ विचारात घेता तसेच जमा होणारा महसूल व रुग्णालयांवर / वैद्यकीय महाविद्यालयांवर होणारा खर्च यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. सदर तफावत कमी करण्यासाठी रुग्णालयातील शुल्क सूचीमध्ये सुधारीत दरवाढ करणे आवश्यक आहे व त्यामुळे महानगरपालिकेच्या दैनंदिन महसूली उत्पन्नात वाढ होईल. तसेच जमा होणारा महसूल व करण्यात येत असलेला खर्च यामधील तफावत कमी होईल.

खालील तक्त्यावरून मुंबई महानगरपालिकेच्या तीन प्रमुख रुग्णालयांचा आणि वैद्यकिय महाविद्यालयांचा सन २०१४-१५ या कालावधीत जमा झालेला महसूल व त्या रुग्णालयांवर आणि महाविद्यालयावर झालेला खर्च याचे स्पष्ट चित्रण दिसून येत:-

**सन २०१४-१५ चा रुग्णालय निहाय जमाखर्च :-**

| वर्ष. | रुग्णालयाचे नाव | जमा (अंदाजे) करोडमध्ये | खर्च (अंदाजे) करोडमध्ये |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | राजे एडवर्डस्मारक रुग्णालय परेल | १४.८८ | २७०.०० |
| | वा. य. ल. नायर धर्मादाय रुग्णालय, मुंबई सेंन्ट्रल | ०८.०७ | १६४.९१ |
| | लोकमान्य टिळक रुग्णालय, शीव | ०८.७४ | २०४.३८ |
| | एकूण रु. | ३१.६९ | ६३९.२९ |

**सन २०१४-१५ या कालावधीतील तीन प्रमुख महाविद्यालयाचा जमा व खर्च यांचा तक्ता :-**

| वर्ष | महाविद्यालयाचे नाव | जमा (अंदाजे) करोडमध्ये | खर्च (अंदाजे) करोडमध्ये |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | जी.एस. वैद्यकीय महाविद्यालय, परेल | १३.२८ | ६२.६१ |
| | टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई सेन्ट्रल | ९.४३ | ४३.५९ |
| | लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्याल, शीव | ६.९९ | ४.१८ |
| | **एकूण रु.** | २९.७ | ११०.३८ |
| | **एकूण ( रुग्णालय व विद्यालय )** | ६३.३९ | ७४९.६७ |

२ वरील तक्त्यानुसार रुग्णालये व महाविद्यालये यांच्या जमा व खर्चाची तुलना केली असता खर्चाचे गुणोत्तर प्रमाण १:१२ येईल. महाविद्यालय आणि रुग्णालये यांचा स्वतंत्र विचार केल्यास हेच प्रमाण महाविद्यालय १:४ व रुग्णालयास १:२० असे दिसून येते. प्रस्तावित सुधारीत शुल्क आकारणी प्रमाणे आकारणी केल्यास रु. ९२.०८ कोटीच्या आपेक्षित वाढीव उत्पन्नामुळे रुग्णालयाचे जमा व खर्चाचे गुणोत्तर प्रमाणात १:८ अशी वाढ होईल.

३ वरील तक्त्यानुसार व जमाखर्चाच्या गुणोत्तरावरून असे आढळून येईल की, महानगरपालिकेच्या रुग्णालयांवरील होणारा खर्च लक्षात घेता जमा होणारा महसूल खर्चाच्या प्रमाणात अगदीच नगण्य आहे. जमाखर्चातील ही दरी काही अंशी भरून काढण्याकरीता रुग्णालयात (रुग्णांकडून ) आकारल्या जाणाऱ्या दरात / शुल्कात काही प्रमाणत वाढ करणे अत्यंत गरजेचे व निकडीचे आहे. तसेच, महानगरपालिकेची सध्याची नाजूक आर्थिक स्थिती पाहता रुग्णालयांवर होणारा खर्च भागविण्यासाठी व सर्वसाधारण अर्थसंकल्पावर येणारा आर्थिक भार काही प्रमाणात कमी करण्याच्या दृष्टीने सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे सध्याच्या अस्तित्त्वात असलेल्या दरात सुधारणा करणे तसेच काही सेवांकरिता नव्याने दर आकारणे गरजेचे असल्यामुळे दर व शुल्कामध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. बृहन्मुंबईतील खाजगी रुग्णालयात आकारण्यात येणारे शुल्क तसेच महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील शासकीय / वैद्यकीय / दंत महाविद्यालयांशी संलग्नीत रुग्णालयातील औषधोपचारांसाठी तसेच निरनिराळ्या वैद्यकीय सुविधांसाठी आकारण्यात येणारे शुल्क दरांशी व आकार यांच्याशी तुलना करता हे दर अत्यल्प, रास्त व वाजवी आहेत.

४ प्रस्तावित सुधारित दरांना महानगरपालिकेची मंजुरी ज्या महिन्यात प्राप्त होईल त्यानंतरच्या येणाऱ्या पहिल्या तारखेपासून महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयात अंमलात आणले जातील.

## उपरोल्लेखित परिशिष्ट 'अ'

### महानगरपालिका रुग्णालयात करण्यात येणाऱ्या निरनिराळ्या चाचण्या, त्यासाठी आकारण्यात येणारे राध्याचे दर तरोच प्रस्तावित सुधारीत दर

| Sr No | G.L. Code No | वैद्यकीय सेवा | सध्याचे दर (०१.०५.२००० पासून ) (रुपये ) | मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रा मधील व क्षेत्राबाहेरी रुग्णांकरिता सुधारित दर २०% प्रमाणे | वैद्यकीय सेवांची इंग्रजीतनावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | १४०८०२३०० | कार्डीयाक कॅथेटरायझेशनच्या जोडणी करीता खास सेवेअंतर्गत जोडणीआकार | २५०० | ३००० | Fixing charges of special services as cardiac catherization |
| २ | १४०८०२४०० | इ. एम. जी. चाचणी | १५० | १८० | E.M.G |
| ३ | १४०८०३९०० | अन्नाहाताळणी प्रक्रिया | ३०० | ३६० | Food Handlers scheme |
| ४ | १४०८०४३०० | इव्होक्ड पोटेंशियल चाचणी | | Evoked Potential test | |
| | १४०८०४३०० | अ) एक चाचणी | ५० | ६० | Single test |
| | १४०८०४३०० | ब) अनेक चाचण्या | १०० | १२० | Multiple test |
| | खाजगी रुग्णालयाकडून आलेले रुग्ण | | References from Pvt. Hospital | | |
| | १४०८०४३०० | अ) एक चाचणी | २०० | २४० | Single test |
| | १४०८०४३०० | ब) अनेक चाचण्या | ३५० | ४२० | Multiple test |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | १४०८०४३००० | युरोडानॅमिक अभ्यास युरोफ्लोमेट्री | २५० | ३०० | Urodynamic Studies Uroflomerry |
| | १४०८०३९०० | वॉटर सीस्टोमेट्रोग्राम इलेक्ट्रोमायोग्राम सहित | ८०० | ९६० | Water cystometrogram with electromyogram |
| | १४०८०३९०० | कार्बन आयॉक्साईड सीसेमेट्रोग्राम | १५०० | १८०० | Carbondioxidecystometrogram with electromyogram |
| | १४०८०३९०० | युरेथेल प्रेशरप्रोफाईल | ८०० | ९६० | Urethral Pressure Profile |
| ६. | १४०८०२७०० | प्रदेय रुग्णशय्या (साईड रुम ) | २०० | २४० | Paying bed ( side room ) |
| | १४०८०२७०० | प्रदेय कक्ष (कक्षातीलवाजूचावि भाग) सुरक्षा अनामतरक्कम | २००० | २४०० | Paying ward (side section ) deposite |
| | १४०८०२७०० | प्रदेय कक्ष कक्षातीलवाजूचा विभाग | १०० | १२० | Paying ward ( side section ) |
| | १४०८०२७०० | प्रदेय कक्ष व प्रदेय रुग्णशय्या यासाटी इतरशुल्क | | Other charges for paying bed and paying wards | |
| | | अ)मोठी शस्त्रक्रिया | | | a)Major operations |
| | १४०८०२२०० | १) अतिविशेप शस्त्रक्रिया | ५००० | ६००० | i)Superspeciality |
| | १४०८०२२०० | २) विशेप शस्त्रक्रिया | १००० | १२०० | ii)Speciality operations |
| | १४०८०२२०० | ब) किरकोळ / गौण शस्त्रक्रिया | ४०० | ४८० | b)Minor operations |
| | १४०८०२४०० | क)क्ष-किरण तपासणीसाठी क्ष- किरणप्लेटस | ६० | ७२ | c)x-Ray plates for x-ray in investigations |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १४०८०४३०० | ड) विकृतीशास्त्रीय/ सूक्ष्मजंतूची तपासणी व बी. एम. आर.तपासणी | ६० | ७२ | d)Pathological & Bacteriological and B.M.R test |
| | १४०८०२४०० | इ)इलेक्ट्रोकार्डीओग्राम ( इ.सी.जी ) | ६० | ७२ | e)Electrocardiagram (ECG) |
| | * (नॉन-मेडीकोलिगलएक्सरे रुग्णांना देण्यात येतील | | | Non-medico-legal X-rays will be handed over to the patients | |
| ७ | १४०८०४३०० | बेरा चाचणी | १०० | १२० | Bera test |
| ८ | १४०८०२४०० | इ.एम.के./एम. सी. यू | १५० | १८० | E.M.K/ M.C.U |
| ९ | १४०८०२४०० | ई.ई.जी | २५० | ३०० | E.E.G |
| १० | १४०८०३१०० | वैद्यकीय निदानप्रमाणपत्र | निवासी वै. अधिकाऱ्यांना देण्यात येणारा अंशत: मोबदला १.५० | निवासी वै. अधिकाऱ्यांना देण्यात येणारा अंशत: मोबदला NIL | Medical opinion |
| | १४०८०३१०० | वैद्यकीय निदान प्रमाणपत्र | ३० १.५० | ३६ | Medical opinion |
| | १०८०३१०० | कामगारभरपाई कायद्यांतर्गत (शारीरिक असमर्थता दाखला ) | १०० २.५० | १२० | Fitness certificate Workmen Compensation cft. ( Disability of percentage |
| | १०८०३१०० | दुखापतप्रमाणपत्र | १०० ५.०० | १२० | Injury Cft |
| | १०८०३१०० | पोलिसांनाद्यावे लागणारे दुखापतप्रमाणपत्र | मोफत | मोफत | Injury Cft required by police |
| | १०८०३१०० | विम्याचा दाखला | १५० | १८० | Insurance ft |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ७.५० | | |
| | १०८०३१०० | अपघातविमाप्रमाणपत्र | १००<br>५.०० | १२० | Accident Insurance Cft |
| | १०८०३१०० | वैद्यकीयबिलाच्या पूर्ततेचेप्रमाणपत्र | ५०<br>५.०० | ६० | Reimbursement Cft |
| | १०८०३१०० | रुग्णाचे वास्तव्य प्रमाणपत्र (दाखल झाल्याचा दिनांक व परत पाठवणीचा/मृत्यूचा दिनांकदर्शविणारे प्रमाणपत्र | १० | १२ | Factual cft. ( indicating the date of admission & date of discharge/ death |
| ११ | १४०८०४८०० | **सी. टी स्कॅन** | | | **C.T Scan** |
| | १४०८०४८०० | महापालिका रुग्णालयातीळ बाह्य तसेच आंतररुग्णांकरीता | १२०० (कॉन्ट्रास्टमिडिया इंजेक्शनच्या दरासहित प्रत्येक तपासणीला ) | १४४० (कॉन्ट्रास्टमिडिया इंजेक्शनच्या दरासहित प्रत्येक तपासणीला ) | O.P.D Patients as well as indoor patients of Municipal Hospital |
| | १४०८०४८०० | बाहेरील रुग्णालयातील तसेच खाजगी रुग्णालयांनी पाठविलेल्या रुग्णांकरिता | २५०० (कॉन्ट्रास्टमिडिया इंजेक्शनच्या दरासहित प्रत्येक तपासणीला ) | ३००० (कॉन्ट्रास्टमिडिया इंजेक्शनच्या दरासहित प्रत्येक तपासणीला ) | Patients referred from outside Hospitals & Pvt Hosp (C.T Scan) |
| ११ अ | १४०८०४९०० | MRI महापालिका रुग्णालयातील बाह्य तसेच आंतररुग्णांकरिता | २५०० | ३००० (कॉन्ट्रास्टमिडिया इंजेक्शनच्या दरासहित प्रत्येक तपासणीला ) | M.R.I |
| | १४०८०४९०० | MRI बाहेरील | २५०० | २५०० | M.R.I |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | रुग्णालयातील तसेच खाजगी रुग्णालयाने पाठविलेल्या रुग्णाकरिता | | (कॉन्ट्रास्टसाठी लागणा इंजेक्शनच्या दरासहित प्रत्येक तपासणीला) | |
| १२ | १४०८०२४०० | अल्ट्रासोनोग्राफी | | | **Ultrasonography** |
| | १४०८०२४०० | अ) महानगरपालिकेच्या रुग्णालयातील रुग्णासाठी | १०० (इमेजिंगफिल्म व्यतिरिक्त) | १२० (इमेजिंगफिल्म व्यतिरिक्त) | a)Patients from Mun Hosp |
| | १४०८०२४०० | ब) महानगरपालिका रुग्णालयातील प्रवेश रुग्णशय्येवरील रुग्णांसाठी | ३०० इमेजिंगफिल्म व्यतिरिक्त) | ३६० इमेजिंगफिल्म व्यतिरिक्त) | b)Paying bed patient in Mun Hosp |
| | १४०८०२४०० | क) महापालिका रुग्णालयाव्यतिरिक्त इतर रुग्णालयातील रुग्णांसाठी | ४०० इमेजिंगफिल्म व्यतिरिक्त) | ४८० इमेजिंगफिल्म व्यतिरिक्त) | c)Patients From Hospital other than Mun.Hosp |
| | १४०८०२४०० | ड) महापालिका रुग्णालयातील बाह्य /आंतररुग्णांना इमेजिंगफिल्म हवी असल्यास अतिरिक्त रु ५०/- आकारण्यात येतील. | ५० | ६० | d)An additional charge of Rs 50/- will be charged if any O P D/ Indoor Patient of Mun.Hosp desires to have the imaging Film |
| १३ | १४०८०२५०० | **नित्यापेक्षा अतिदाबाच्या प्राणवायूची चिकित्सा (हायपरबेरीक थेरपी)** | Hyperberic Oxygen Therapy | | |
| | १४०८०२५०० | अ) महापालिका रुग्णालयातील रुग्णांसाठी | १५० ऐका बैठकीला | १८० ऐका बैठकीला | Patients referred by Mun. Hospital |
| | १४०८०२५०० | ब) खाजगी वैद्यकीय | २५० | ३०० | Patients referred by pvt Doctors, Hosp Nursing Homes |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अधिकारी, इस्पितळे यांनी पाठविलेल्या रुग्णासाठी | ऐका बैठकीला | ऐका बैठकीला | |
| १४ | १४०८०२७०० | तात्काळ विभागातील रुग्णशय्यचे दर TRAUMA | १०० प्रतीदिवशी | १२० प्रतीदिवशी | Bed charges for emergency ward |
| १५ | १८०८०९९०० | व्हिडीयो / फिल्म छायाचित्रण | ५०००/- सूरक्षा अनामतरक्कम ५०००/- प्रतीदिवशीअधिक | ६०००/- सूरक्षा अनामतरक्कम ६०००/- प्रतीदिवशीअधिक | Video/ Film shooting |
| १६ | १४०८०३७०० | प्रसुतीशुल्क | ५००/- (दुसऱ्या मुलानंतर) | ६००/- (दुसऱ्या मुलानंतर) | Delivery charges |
| १७ | १४०८०२५०० | क्ष-किरणचिकित्सा (रेडियोथेरपी) | Radiotherapy | | |
| | १४०८०२५०० | अ) महापालिका /शासकीय रुग्णालयांनी पाठविलेल्या रुग्णासाठी | १५०० प्रत्येक कोर्सला | १८०० प्रत्येक कोर्सला | a)Patients referred from mum.Hosp/ Govt. Hosp. |
| | १४०८०२५०० | ब) खाजगी रुग्णालयाचे /खाजगी ऑन्कॉलॉजीस्टयांनी पाठविलेल्या रुग्णांसाठी | ५००० प्रत्येक कोर्सला | ६००० प्रत्येक कोर्सला | b)Patients referred from pvt.Hosp/ Pvt. oncologists |
| १८ | १४०८०३८०० | अतिदक्षता विभागाचे शुल्क MICU,ICCU,IPCU,NICU, WARD, IRCU | २०० प्रतीदिवशी | २४० प्रतीदिवशी | I.C.U charges |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | १४०८०२६०० | २डीएको | ४०० | ६०० | 2D Echo |
| २० | १४०८०२१०० | अ) पहिल्या वेळी १४ दिवसासाठी नविन बाह्य रुग्णांसाठी | १० | १२ | a)Issue of new OPD case paper for the 1st time for a period of 14 days |
| २० अ | १४०८०२१०० | ब) पूनर्तपासणीसाठी (१४ दिवसांसाठी) | १० | १२ | b)Follow up Cases (for 14 days) |
| २१ | | हॉल्टरमॉनिटरींग | ४०० | ६०० | Holter monitoring |
| २२ | १४०८०२६०० | स्ट्रेसटेस्ट | ४०० | ६०० | Stress Test |
| २३ | १४०८०२८०० | हार्मोनअॅसे / ऑर्गनस्कॅन्स महापालिका रुग्णालयातील रुग्णांसाठी महापालिका रुग्णालया व्यतिरिक्त इतर रुग्णालयातील रुग्णांसाठी आकारावयाचे शुल्क* | | | Hormone assay/ organ Scans Patients from mun. Hosp and Patients frm Hospital other than Mun. Hosp |
| | १४०८०२८०० | अ) थायरॉईडशुल्क | १०० | १२० | a)Thyroid scan |
| | १४०८०२८०० | ब) बोनस्कॅन | १५० | १८० | b)Bone scan |
| | १४०८०२८०० | क) फिटेटस्कॅन | १५० | १८० | C) Phyate Scan |
| | १४०८०२८०० | ड) बुलिडा स्कॅन | १५० | १८० | D) Builda Scan |
| | १४०८०२८०० | इ) मुगास्कॅन | १५० | १८० | e) Muga Scan |
| | १४०८०२८०० | एफ) रेनोग्रॅमस्कॅन | १५० | १८० | f) Renogram Scan |
| | १४०८०२८०० | जी) मिल्कस्कॅन | १५० | १८० | g) Milk Scan |
| | १४०८०२८०० | एच) लंगस्कॅनव्ही /पी | १५० | १८० | h) Lung scan V/p |
| | १४०८०२८०० | आय) जी.आय.बी./जी.इ | १५० | १८० | i)G.I.B / G.E |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १४०८०२८०० | जे) थेलीयम स्कॅन | ३२५० | ३९०० | j) Thallium Scan |
| | १४०८०२८०० | के) आय १३१ डोस | ७५० | ९०० | k) I 131 dose |
| | १४०८०२८०० | एल) ब्रेनस्कॅन | ५०० | ६०० | L) Brain scan |
| | १४०८०२८०० | एम) टी ३ टी ४ आणिटीएसएच | २०० | २४० | m) T3 T4and TSH |
| | १४०८०२८०० | एन) ब्रेनस्कॅन | ६०० | ७२० | n) Breast scan |
| | १४०८०२८०० | ओ) स्टमकस्कॅन | ७५० | ९०० | o) Stomach scan |
| | १४०८०२८०० | पी) इतरस्कॅन | २५० | ३०० | P) Other scan |
| | १४०८०२८०० | मॅनोमेटरी | ० | ५०० | Monometry |
| २४ | १४०८०४३०० | बेरीयम चाचणी / आय. व्ही. पी. व इतर | २०० | २४० | Barium Test / I.V.P etc |
| २५ | १४०८०२४०० | कलर डॉप्लर | ५०० | ६०० | Color Doppler |
| २६ | १४०८०४३०० | टी.डी.एम.ड्रगमॉनिटरींग | ५० साधनसामुग्री रुग्णांनी आणावी. | ६० साधनसामुग्री रुग्णांनी आणावी. | TDM ( drug monitoring) |
| २७ | १४०८०२२०० | शस्त्रक्रिया | | | **Operations** |
| | १४०८०२२०० | अ) मोठी शस्त्रक्रिया (अतिविशेष शस्त्रक्रिया) सी.व्हि.टी.एस. निरो सर्जरी किडनी ट्रान्सप्लान्ट | ५००० साधनसामुग्री रुग्णांनी आणावी. | ६००० साधनसामुग्री रुग्णांनी आणावी. | a)major operation (superspeciality)<br>C.V.T.S<br>Neuro Surgery<br>Kidney Transplant |
| | १४०८०२२०० | ब) किरकोळ / गौण शस्त्रक्रिया सी.व्हि.टी.एस. निरो सर्जरी किडनी ट्रान्सप्लान्ट | २००० साधनसामुग्री रुग्णांनी आणावी. | २४०० साधनसामुग्री रुग्णांनी आणावी. | a)minor operation (superspeciality)<br>C.V.T.S<br>Neuro Surgery<br>Kidney Transplant |
| | १४०८०२२०० | अ) मोठी शस्त्रक्रिया (अतिविशेष | २००० साधनसा | २४०० साधनसामुग्री | a)major operations (superspeciality)<br>Urology<br>Plastic Surgery |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | शस्त्रक्रिया) युरोलॉजी प्लास्टीक सर्जरी पीडियाट्रीक सर्जरी | मुग्री रुग्णांनी आणावी. | रुग्णांनी आणावी. | Paediatric |
| | १४०८०२२०० | ब) किरकोळ / गौण शस्त्रक्रिया युरोलॉजी प्लास्टिक सर्जरी पिडियाट्रिक सर्जरी | १००० साधनसामुग्री रुग्णांनी आणावी. | १२०० साधनसामुग्री रुग्णांनी आणावी. | a)minor operations (superspeciality)<br>Urology<br>Plastic Surgery<br>Paediatric |
| | १४०८०२२०० | ब) मोठी शस्त्रक्रिया (विशेष शस्त्रक्रिया) | ५०० | ६०० | B) major operation (specially) |
| | १४०८०२२०० | क) किरकोळ / गौण शस्त्रक्रिया | २०० | २४० | c) minor operation |
| २८ | १४०८०२९०० | अ) क्ष- किरणतपासणी | | | a)X-ray |
| | १४०८०२९०० | ब) रुग्णाना सोपविण्यासाठी | ३० प्रत्येक प्लेटसाठी | ३६ प्रत्येक प्लेटसाठी | b) Handling Over to the patient |
| | १४०८०२९०० | 1) क्ष-किरण तपासणी प्लेट | ३० प्रत्येक प्लेटसाठी | ३६ प्रत्येक प्लेटसाठी | 1)X-ray plate |
| | १४०८०२९०० | अनॉलॉग मेमोग्राफ़ी विथ टोमोग्राफ़ी | २२० | २६४ | Anolog Mammogrphy with Tomography |
| | १४०८०२९०० | डिजिटल मेमोग्राफी विथ टोमोग्राफी | ० | ३०० | Digital Mammography with tomography |
| | १४०८०२४०० | 2) ई.सी.जी. | २० प्रत्येकी | २४ प्रत्येकी | 2)E.C.G |
| २९ | १४०८०४३०० | GASTRO SCOPY | | | GASTRO SCOPY |
| | १४०८०४३०० | OGD SCOPY | ० | २५० | OGD Scopy |
| | १४०८०४३०० | Colonoscopy | | ३५० | colonoscopy |
| | १४०८०४३०० | ERCP | | ४०० | ERCP |
| ३० | १४०८०४३०० | **PATHO & MICROBIOLOGY TEST** | | | PATHO & MICROBIOLOGY TEST |
| | 1 | एबीजी | ० | ० | ABG |
| | 2 | एस. इलक्ट्रोलाइस | ० | ० | S.Electrolytes |
| | 3 | एचबी | ० | ० | Hb |